

# मुलगा म्हणजे?
# मुलगी म्हणजे?



मूळ लेखिका : कमला भसीन

**‘मुलगा म्हणजे? मुलगी म्हणजे?’**

**मूळ लेखिका:** कमला भसीन

**प्रकाशक व मुद्रक:**

अलका जोशी, अभिव्यक्ती, c/o लोकायत, १२९/बी-२,
सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप जवळ, पुणे – ४.
संपर्क: ०९४२२३१९१२९

**मुद्रणस्थळ:**

आर. एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे – ३०.

**पहिली आवृत्ती:** ऑक्टोबर २०१६

**सहयोग मूल्य: ₹ १०/-**

# प्रस्तावना

स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे पूर्ण झाल्यावरही आपल्या देशात मुली आणि स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान आहे. मुलगी जन्माला आली तर त्याबद्दल आनंद वाटत नाही. मुलींना पुरेसे प्रेम, माया लाभत नाही, त्यांचे संगोपन, औषधपाणी, खाणे पिणे याबाबतीतही तितकेसे लक्ष पुरवले जात नाही. 'मुलगा खातो तुपाशी अन मुलगी राहते उपाशी' या म्हणीचा प्रत्यय आजही वारंवार येतो. कित्येक ठिकाणी मुलगी जन्माला येण्यापूर्वी वा जन्माला येताच तिला मारून टाकलं जातं.

कुटुंबामध्ये अशा प्रकारचा भेदभाव, अन्याय केला जातो ही खरोखरच लाजिरवाणी गोष्ट आहे. अशा प्रकारच्या भेदभावांमुळे केवळ मुली आणि स्त्रियांचंच नुकसान होत नसून संपूर्ण कुटुंब आणि समाजाचं नुकसान होतं. घरातली निम्मी माणसं निरोगी, सुशिक्षित आणि निम्मी माणसं अर्धशिक्षित, उपाशी! तर मग ज्या कुटुंबाचा किंवा समाजाचा अर्धा हिस्सा अशक्त, अशिक्षित आणि गांजलेला असेल, त्या कुटुंबाला किंवा समाजाला तरी सुख कसे लागणार.

ही परिस्थिती बदलली पाहिजे आणि ती बदलण्यासाठी आपण ती समजून घेणं फार महत्त्वाचं आहे. अनेकांना असं वाटतं की निसर्गानेच स्त्री पुरुषांमध्ये असमानता निर्माण केली आहे. पण खरंच तसं आहे का? की हे फरक आणि भेदभाव समाजाने निर्माण केलेले आहेत? मुले आणि मुलींची वागण्याची पद्धत, त्यांच्या आवडी-निवडी, त्यांच्यातील कलाकौशल्ये, त्यांचं जीवन निसर्गाने निर्माण केलं की समाजाने? आणि समाज म्हणजे तरी कोण? तुम्ही, आम्ही, आपणच सर्वजण नाही का?

या छोट्याशा पुस्तिकेत या प्रश्नांवर विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा तऱ्हेच्या चर्चांतून, विचारमंथनातून एक दिवस ही परिस्थिती बदलेल, आपल्या मुलींच्या जीवनातील भेदभाव व अन्याय दूर होतील. तसेच मुलांवर समाजाने ठरवून दिलेल्या भूमिका व वागण्याच्या विशिष्ट अपेक्षा लादल्या जाणार नाहीत. असं झालं तर आपल्या कुटुंबात प्रेम, सद्भाव आणि शांती नांदेल. मुले आणि मुले, स्त्रिया आणि पुरुष बरोबरीच्या वातावरणात एकत्र प्रगती करतील. ही पुस्तिका आपणा सर्वांना आवडेल आणि उपयोगी पडेल अशी आशा आहे.

या पुस्तिकेच्या मूळ लेखिका कमला भसीन आणि मुख्य प्रकाशक 'जागोरी' यांनी अनुवादास व प्रकाशनास परवानगी दिली त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

# अभिव्यक्ती विषयी...

मित्र-मैत्रिणींनो,

आज २१व्या शतकात स्त्रिया मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या आहेत. निरनिराळ्या क्षेत्रांत जबाबदारीच्या जागा त्या सांभाळत आहेत. स्त्री आता पंतप्रधान, मुख्यमंत्री, सरपंच, सरन्यायाधीश, डॉक्टर, पायलट, वकील, इंजिनिअर होऊ शकते. परंतु अजूनही मुलीचा जन्म झाला तर आईवडिलांना वाईट वाटतं. एवढंच नव्हे तर गर्भलिंगपरीक्षा करून घेऊन मुलीचा जन्मच होऊ नये म्हणून गर्भपात करण्यात येतो. स्त्रियांनी समाजात प्रगती केली हे खरं असलं तरी पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीला माणूस म्हणून समाजात स्थान मिळण्यासाठी अजून बराच मोठा रस्ता पार करायचा आहे. भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व मान्य केले, तरी सामाजिक कौटुंबिक व आर्थिक जीवनात स्त्री-पुरुष विषमता कायमच राहिली. संविधानाने मान्य केलेली स्त्री-पुरुष समानता भारतीय लोकांनी मनाने स्वीकारलेली नाही.

अशा परिस्थितीत स्त्री-पुरुष समानतेचा विषय सामान्य माणसांपर्यंत सोप्या व आकर्षक पद्धतीने पोहोचविणे आणि हा विचार रुजविणे हे अत्यंत कठीण काम आहे.

समाजातील या प्रश्नांवर एकेकट्या स्त्रिया लढू शकत नाही, कारण प्रश्न फार बिकट आणि गंभीर आहेत. म्हणूनच **अभिव्यक्ती** सारख्या संघटनांची आज गरज आहे. या पार्श्वभूमीवर अभिव्यक्तीने ही पुस्तिका छापायचे ठरवले. अभिव्यक्ती ही स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणारी **लोकायत**ची महिला आघाडी आहे. विविध माध्यमांचा वापर करत आपण अभिव्यक्ती मार्फत समाजातील स्त्रियांचे प्रश्न लोकांसमोर मांडतो.

अभिव्यक्तीची दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी ६ ते ८ या वेळेत बैठक होत असते, याशिवाय दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी ९ ते १ या वेळेत बैठक होत असते. सर्व महिलांसाठी ही बैठक खुली आहे. आपणही या उपक्रमांमध्ये सामील होऊ शकता आणि स्त्रियांच्या लढ्यामध्ये एकत्रितपणे आपला सहभाग नोंदवू शकता.


**संपर्क पत्ता:** अभिव्यक्ती, c/o लोकायत, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप जवळ, पुणे – ४११००४.

अलका – 9422319129, तृप्ती – 9422308126 www.lokayat.org.in


pune.abhivyakti@gmail.com /abhivyakti.pune




मुलगी म्हणजे काय?
मुलगा म्हणजे काय?

मूल जेव्हा जन्माला येतं तेव्हा ते मुलगी असते किंवा मुलगा.





पण मुलगी म्हणजे
नक्की काय?








काही लोक म्हणतात,
जिचे केस लांब
असतात ती मुलगी.

कुलदीपचे केस पहा किती लांब आहेत.
पण तो तर मुलगा आहे!






काही लोक म्हणतात, जी दागिने घालते ती मुलगी.



मेघराज गळ्यात माळ घालतो आणि कानात डूल *सुद्धा* घालतो. पण तो तर मुलगा आहे!






मग मुलगा म्हणजे काय?


काही लोक म्हणतात, अर्धी चड्डी घालतो आणि झाडावर चढू शकतो तो मुलगा.

राणी अर्धी चड्डी घालते आणि झटकन झाडावर चढू शकते पण ती तर मुलगी आहे!





काही लोक म्हणतात, जो ताकदवान आहे आणि जड ओझे उचलू शकतो तो मुलगा.



सईदा आणि राधा दोन दोन घागरी पाणी आणि लाकडाच्या मोळ्या उचलू शकतात आणि त्या तर मुली आहेत!





काही लोक म्हणतात, जी घरकामात
मदत करते ती मुलगी असते.




जोसेफ स्वयंपाकात, साफसफाईत मदत करतो आणि तो तर मुलगा आहे!





काही लोक म्हणतात,
शेतात काम करतात ते
मुलगे आणि पुरुष
असतात.






सुषमा आणि तिची आई शेतात काम करतात. त्या तर स्त्रिया आहेत!




काही लोक म्हणतात, जे बाजारातले व्यवहार करतात ते पुरुष असतात.

रखमा मासे विकायला बाजारात जाते.
पण ती तर मुलगी आहे!





काही लोक म्हणतात, ज्या नाजूक आणि ममताळू असतात त्या मुली असतात.




कबीर कोमल व ममताळू आहे. तो मायेनं दिवसभर आपल्या छोट्या बहिणीला सांभाळतो. आणि तो मुलगा आहे!





काही लोक म्हणतात, जे बाहेरची कामं चांगल्या प्रकारे करू शकतात ते पुरुष असतात.



अरुणा जिल्ह्याची कलेक्टर असल्याने ती संपूर्ण जिल्ह्याची सुव्यवस्था पाहते. आणि ती तर स्त्री आहे!



तर मग,
मुलगा म्हणजे काय?
मुलगी म्हणजे काय?




मुलगा म्हणजे ज्याला
लिंग व अंडग्रंथी आहेत.

मुलगी म्हणजे जिला योनी
व शिश्नीका आहे.

प्रत्येक मुलगा मोठा झाल्यावर पुरुष
होतो. प्रत्येक पुरुषाला लिंग व
अंडग्रंथी असतात.

प्रत्येक मुलगी मोठी झाल्यावर स्त्री होते.
प्रत्येक स्त्रीला योनी, गर्भाशय व स्तन
असतात. स्त्रीच्या शरीरात मूल तयार होतं
व वाढतं. स्त्री मुलाला जन्म देते व
अंगावरचे दूध पाजते.

या शारीरिक फरकाखेरीज मुले आणि मुली यांच्यात काही फरक नसतो. मुलाच्या आणि मुलीच्या शरीररचनेत फरकापेक्षा सारखेपणाच अधिक आहे. लैंगिक आणि प्रजनन अवयव सोडून बाकी सर्व अवयव एकसारखे आहेत.



या शरीररचनेला **नैसर्गिक लिंग** रचना म्हणतात. आपल्या शरीररचनेमुळे मुलाचे लिंग पुल्लिंग व मुलीचे लिंग स्त्रीलिंग होते. हा जैविक फरक निसर्गानेच घडवलेला आहे. हा फरक प्रत्येक कुटुंबात, समाजात, देशांमध्ये एकसारखा असतो. म्हणजेच शारीरिक दृष्ट्या जगातील सर्व मुलगे हे एकसारखेच आणि सर्व मुली या एकसारख्याच असतात.




शारीरिक फरकाशिवाय मुला-मुलींमध्ये जे फरक केले जातात, म्हणजे त्यांचे कपडे, वागणूक, शिक्षण, समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हे नैसर्गिक नसून सामाजिक वा सांस्कृतिक स्वरूपाचे असतात. आणि म्हणूनच हे सामाजिक वा सांस्कृतिक भेदभाव प्रत्येक कुटुंबात, देशात आणि समाजात एकसारखे नसतात.



जसं आपण मगाशी बघितलं, काही मुलींचे केस लांब असतात तर काहींचे आखूड. काही कुटुंबांमध्ये मुलगे घरकाम करतात तर काहींमध्ये करत नाहीत. काही ठिकाणी स्त्रिया घरातच काम करतात तर काही ठिकाणी त्या घराबाहेरचीही कामे करतात.






समाजाने ठरविलेल्या स्त्री-पुरुषांच्या या व्याख्येला **'सामाजिक वा सांस्कृतिक लिंग'** म्हणतात.





उदाहरणार्थ, मुलगी घरात राहील आणि मुलाने बाहेर जावं. किंवा मुलीला खायला कमी दिलं जाईल, खेळायला कमी वेळ दिला जाईल आणि मुलाला जास्त. मुलाला उत्तम शाळेत पाठवलं जाईल म्हणजे तो मोठा होऊन घरचा व्यवसाय सांभाळू शकेल किंवा चांगली नोकरी मिळवू शकेल आणि मुलीच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले जाणार नाही असे नियम समाजाने बनवले आहेत.





हे सर्व सामाजिक लिंगभेद निसर्गाने निर्माण केलेले नाहीत. निसर्ग फक्त मुलगी आणि मुलगा निर्माण करतो. मात्र समाज त्यांच्यातील या वेगळेपणाचे ‘स्त्री’ आणि ‘पुरुष’ अशा साचेबद्ध भूमिकांमध्ये विभाजन करतो.





समाजाच्या या स्त्री-पुरुषविषयक
चाकोरीबद्ध दृष्टिकोनामुळे मुलगा आणि
मुलगी असा भेद वाढतच चालला आहे.
जणु काही मुलगा आणि मुलगी, स्त्री
आणि पुरुष यांचं जगच पूर्णपणे
वेगवेगळं असल्यासारखं झालं आहे.



हा सामाजिक लिंगभेदच मुलगा-मुलगी, स्त्री-पुरुष यांच्यात असमानता निर्माण करतो. पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ, पुरुष सबल, बाई दुर्बल, पुरुषाची मजुरी जास्त आणि बाईची कमी. पुरुष सत्ताधारी आणि स्त्रीला सत्ताच नाही!

हे सर्व कोण ठरवतं? समाजच ना? आणि समाज म्हणजे तरी कोण? तुम्ही, आम्ही, आपण सगळे.



निसर्ग भेदभाव करत नाही. निसर्गाने फक्त प्रजननासाठी स्त्री-पुरुषांना वेगवेगळी इंद्रिये दिलेली आहेत. एवढंच. स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव, श्रेष्ठ-कनिष्ठता, इतर फरक, जगण्याच्या निरनिराळ्या पद्धती समाज – म्हणजेच आपण निर्माण करतो. गरीब-श्रीमंत, दलित-सवर्ण, काळे-गोरे, स्त्री-पुरुष हे भेदभाव समाजाने निर्माण केलेले आहेत, निसर्गाने नव्हे!



खरं तर प्रत्येक माणसात स्त्री
आणि पुरुष दोन्हीही असतात.
पण मुलीत दडलेलं पुरुषत्व
आणि मुलात दडलेलं स्त्रीत्व
समाज व्यक्त होऊ देत नाही.

स्त्री-पुरुषांमधल्या
सारखेपणाला प्रोत्साहन
देण्याऐवजी समाज
त्यांच्यातले भेदच
अधोरेखित करत राहतो.

आणि त्यामुळेच मुलगा
आणि मुलगी यांच्या
जडणघडणीत फरक
केला जातो. या
भेदभावांमुळेच
त्यांच्यातील तणाव व
संघर्ष वाढत गेले आहेत.

जगातील बहुतेक देशांमध्ये सामाजिक लिंगभेद पितृसत्ताक आहेत. म्हणजेच तेथे पुरुषांचे वर्चस्व आहे आणि पुरुषांना सर्व बाबतीत प्राधान्य दिले जाते. सामाजिक लिंगभेद स्त्रियांच्या विरोधात असल्यामुळे मुलींवर अनेक बंधनं लादली जातात आणि त्यांच्याबाबतीत पक्षपात व हिंसाचार होतो.





याच कारणामुळे मुली मुलांसारखी प्रगती करू शकत नाहीत. आपल्या गुणांचा विकास करू शकत नाहीत. एकाच घरात मुले फुलताना दिसतात तर मुली कोमेजताना दिसतात.

या लिंगभेदाचा दुष्परिणाम फक्त
मुलींवरच नव्हे तर त्यांच्या कुटुंबावर,
परिसरावर आणि

संपूर्ण देशावर होतो.


मुलांवरदेखील काही विशेष कामं, गुण, अपेक्षा आणि जबाबदाऱ्या लादल्या जातात. म्हणूनच तेसुद्धा लिंगभेदाचे गुलाम व बळी ठरतात.



सामाजिक लिंगभेद मानवनिर्मित आहेत. त्यामुळे आपण ठरवलं तर त्यात बदल करू शकतो. मुलगा आणि मुलगी, स्त्री आणि पुरुष यांची नवीन परिभाषा तयार करू शकतो. आपण अशा समाजाची निर्मिती करू शकतो, जिथे मुलगी असणं म्हणजे कनिष्ठ, दुर्बल असं नसेल. तसंच, मुलगा असणं म्हणजे क्रूर, वर्चस्व गाजवणारा आणि हिंसक असं नसेल.

खरं तर कोणतीही मुलगी किंवा मुलगा त्यांना हवे ते कपडे वापरू शकतात, त्यांना हवे ते खेळ खेळू शकतात, शिकू शकतात. केवळ मुलीचा जन्म घेतला म्हणून घरकाम आणि सेवाभाव येतो असं नाही. तसंच केवळ मुलगा म्हणून जन्मल्याने निडरपणा, हुशारी, सामर्थ्य येते असं नाही. हे सर्व गुण आणि कामं शिकावी लागतात. कसं वाढवले जातं त्यावर प्रत्येक जण कसा वाढतो, कोण बनतो हे ठरते.



आपण मनात आणलं तर असा समाज घडवू शकतो जिथे काम, गुण, जबाबदाऱ्या, कौशल्यं, वागण्याच्या पद्धती कोणत्याही लिंग, जात, रंग, वर्ग यांच्यावर अवलंबून नसतील. प्रत्येक जण आपली इच्छा व स्वभावानुसार काम करू शकेल, कौशल्यं आत्मसात करू शकेल आणि आपल्या निवडीनुसार स्वतःचे जीवन घडवू शकेल.



# चर्चेसाठी काही मुद्दे

जगण्याच्या दोन पद्धती आहेत. एक म्हणजे कोणतेही प्रश्न न विचारता रूढी, परंपरा, कायदे यानुसार वागणे. जे आहे ते स्वीकारणे, जतन करणे. आपण असं का करत आहोत, असं केल्याने त्याचा फायदा आहे किंवा नुकसान काय आहे हे न विचारता जगत राहाणे.

दुसरी पद्धत म्हणजे आपण असे का करतो याचा सजगपणे विचार करणे आणि जाणीवपूर्वक सर्व व्यवहार करणे. केवळ एखादी प्रथा आखून दिलेली आहे म्हणून आपण त्या मार्गावर चालतो की ती प्रथा चांगली आहे, सगळ्यांसाठी फायदेशीर आहे म्हणून त्या मार्गावर चालतो? आम्हाला असं वाटतं की जाणीवपूर्वक जगणं अधिक उचित आहे, त्यात खरी मजा आहे.

बदलत्या काळानुसार आपणही बदलत राहतो. आपण जर जागरूक राहिलो, प्रश्न विचारायची हिंमत केली तर समाजविषयक विचार करण्याचा, समाजाला घडवण्याचा किंवा बिघडवण्याचा मक्ता काही ठराविक लोकांच्या हातात राहात नाही.

ज्या विषयावर आपण चर्चा सुरू केली आहे, ती चर्चा यापुढेही चालू ठेवण्याची अधिक गरज आहे, ती म्हणजे आपल्या घरात-समाजात असणारा स्त्री-पुरुषांचा दर्जा, स्त्री-पुरुषांचे नातेसंबंध. या विषयावर चर्चा करण्यासाठीच ही छोटीशी पुस्तिका लिहिली आहे.

या पुस्तिकेमध्ये एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे, मुलगी-मुलगा किंवा स्त्री-पुरुष म्हणजे काय? या दोघांमध्ये काय फरक आहे? मुलांची आणि मुलींची कामं, त्यांचे गुण वेगवेगळे असणं आवश्यक आहे का? जर भेद आवश्यक असेल तर त्यात श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व का? वेगळेपणातही समानता असू शकेल का? दोघांच्या कामाला आणि श्रमाला समान दर्जा आणि सन्मान देता येईल का?

असे प्रश्न उपस्थित करून छोटी मुलं आणि मोठी माणसं यांच्याशी गटागटांतून चर्चा केली जाऊ शकते. वरील मुद्दे लोकांना आपल्या परिसराशी जोडून घेता येतील अशा पद्धतीने ती व्हावी.

उदाहरणादाखल पुढील प्रश्न चर्चेत उपस्थित करू शकतो –

- आपल्या गावातल्या सर्व मुलींचे केस लांब आणि सर्व मुलांचे केस आखूड आहेत का?
- एखाद्या मुलीचे केस आखूड आहेत म्हणून किंवा एखाद्या मुलाचे केस लांब आहेत म्हणून त्यावरून त्यांची खिल्ली उडवली जाते का?
- एखादी मुलगी पँटशर्ट घालते का? लोक तिला हसतात का?
- कुणी मुलगा गळ्यात चेन किंवा कानात डूल घालतो का? त्यामुळे तो मुलींसारखा होतो का?
- मुली झाडावर चढतात का? नसतील तर का नाही?
- आपल्या घरातील कोणती कामं फक्त मुलीच करतात आणि मुलं करत नाहीत?
- अशी कोणती कामं आहेत जी स्त्रियांना आणि मुलींना करू दिली जात नाहीत? असं का?
- जास्त कष्टाची कामं कोण करतं?
- मुली मैदानी खेळ खेळतात का? त्या मुलांबरोबर खेळतात का?
- मुलींना शिकण्यासाठी पाठवलं जातं का?
- मुली निर्भयपणे बाहेर वावरू शकतात का?
- एखाद्या एकट्या मुलीची छेडछाड किंवा टिंगलटवाळी केली जाते का? कोण करतं? आजूबाजूचे लोक याबाबतीत काय करतात?
- एका स्वतंत्र देशात आपल्याच वस्तीत किंवा गावात मुली न भीता वावरू शकत नाहीत यावर समाज गप्प का बसतो?
- कुटुंबामध्ये मुलगा आणि मुलगी समान मानतात का? त्यांना समान वागणूक, बरोबरीचा दर्जा, प्रेम, सुविधा मिळतात का?
- तुम्हाला योग्य वाटत नाहीत अशा काही रूढी, परंपरा, पद्धती आहेत का? कोणत्या आणि तुम्ही त्या बदलू इच्छिता का?
- मुलाला आणि मुलीला समान मानलं पाहिजे असं तुम्हाला वाटतं का? वाटत असेल तर का? आणि नसेल तर का नाही?
- आपल्या घरात कुणावर अन्याय होत असेल तर तुम्हाला काय वाटतं? तुम्ही गप्प राहाता की काही करण्याचा प्रयत्न करता?
- तुम्ही तुमच्या कुटुंबात काही बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केले आहेत का? असतील तर कोणते? त्यावर इतरांच्या काय प्रतिक्रिया होत्या?

अशा प्रकारे आपण अनेक प्रश्न चर्चेत उपस्थित करू शकतो. प्रत्येकाला बोलण्याची संधी देऊ शकतो.

याशिवाय काही विषयांवर आपण चर्चा घडवून आणू शकतो. जसं, घरात कोणाची काय कामं असतात? जास्त काम कोण करतं? कोण, कुणाशी, कसं बोलतं? कोण आधी जेवतं? गावातल्या किती स्त्रिया घराबाहेर कामासाठी जातात? त्या कोणत्या प्रकारचं काम करतात? त्यांना मजुरी किती मिळते? पुरुषांइतकीच मिळते का? पैसे कमावणाऱ्या स्त्रियांना कुटुंबात आणि समाजात अधिक मान असतो का?

आपल्याला अयोग्य वाटणाऱ्या गोष्टींची यादी करून त्यात बदल कसे करता येतील यावर चर्चा घेऊ शकतो. अशा प्रकारचे बदल घडवून आणायला गट काही ठोस पावलं उचलू शकेल का? चर्चेत अधिक पुढे जाऊन जर काही ठोस पावलं उचलता आली किंवा काही ठोस कार्यक्रम करता आले तर अधिकच उत्तम.

कुटुंबात आणि समाजात मुला-मुलींमध्ये भेदभाव असणार नाही हे आमचं स्वप्न आहे. दोघांनाही बरोबरीने फुलण्या-फळण्याची, शिकण्या-सवरण्याची आणि जगण्याची संधी दिली जावी. समाजातील अधिकाधिक लोकांचं जर हे स्वप्न असेल आणि अनेक लोक हे स्वप्न साकार करण्यासाठी ठोस पावलं उचलायला तयार असतील, तर हा बदल निश्चित घडेल.

वैज्ञानिक म्हणतात एका छोट्याशा फुलपाखराच्या पंख फडफडविण्यामुळे सुद्धा दूरपर्यंतच्या परिसरावर परिणाम घडून येतो. जर आपण सर्वांनी मिळून काही केलं, तर नक्कीच पुष्कळ बदल घडवता येतील.

# आमची इतर प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| ये दिल मांगे मौत (कोक-पेप्सी भारत छोडो) | रु | ५/- |
| देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे | रु | ५/- |
| हे मला माहीत हवं! | रु | ५/- |
| तरुणांनो, विचार कराल तर ... | रु | ५/- |
| विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद | रु | ५/- |
| मी नास्तिक का आहे: शहीद भगतसिंग | रु | ५/- |
| लढा वॉलमार्टशी | रु | १०/- |
| केंद्रीय बजेट २०१५-१६ | रु | १०/- |
| तुम्ही बेकार का? | रु | १५/- |
| शहीद भगतसिंगाचे तरूणांना आवाहन | रु | १५/- |
| शिक्षणाची राखरांगोळी | रु | १५/- |
| इरादे कर बुलंद | रु | १५/- |
| भारत पुन्हा गुलामीकडे | रु | २०/- |
| देशावर फॅसिझमचे संकट | रु | २०/- |
| सरकार खरंच गरीब आहे का? | रु | २०/- |
| उठ माणसा: गाणी संघर्षाची | रु | ३०/- |
| जागतिकीकरण की नवी गुलामगिरी | रु | १५०/- |
| Budget 2016-17: Achhe Din for Whom? | Rs | 10/- |
| Palestine, Israel and the Arab-Israeli Conflict | Rs | 10/- |
| Let's Rise from the Shadows! | Rs | 15/- |
| The Crisis of Global Warming | Rs | 15/- |
| Who was Shivaji? | Rs | 20/- |
| India Becoming a Colony Again | Rs | 20/- |
| Spectre of Fascism | Rs | 20/- |
| Is the Government Really Poor? | Rs | 20/- |
| Unite, to Fight Nuclear Madness! | Rs | 20/- |
| Neoliberal Fascist Attack on Education | Rs | 25/- |
| Globalisation or Recolonisation? | Rs | 150/- |
| Education under Globalisation | Rs | 275/- |
| Nuclear Energy: Technology From Hell | Rs | 295/- |

# मुलगा म्हणजे?
# मुलगी म्हणजे?

स्त्री-पुरुषांमध्ये जी विषमता दिसते तिचे कारण ना निसर्ग आहे, ना लिंग. जात, वंश आणि वर्ग यातील विषमतेप्रमाणे स्त्री-पुरुषांमधील विषमता सुद्धा पूर्णतः मानवनिर्मित आहे. विशिष्ट ऐतिहासिक कालखंडामध्ये या विषमतेची निर्मिती केली गेली आणि म्हणूनच तिला प्रश्न विचारले जाऊ शकतात, आव्हान दिले जाऊ शकते आणि बदलही घडवून आणता येऊ शकतो. स्त्री मुलांना जन्म देते म्हणून ती दुय्यम ठरत नाही. तसेच त्यामुळे तिच्या नोकरी-व्यवसायावर परिणाम व्हायला नको. दोन भिन्न प्रकारची शरीरे आहेत म्हणून त्यांच्यात विषमता का निर्माण व्हावी? समान संधी, समान हक्क किंवा समानता मिळण्यासाठी सर्व व्यक्ती सर्वार्थाने एकसारख्याच असायला हव्यात, असे नाही.

या पुस्तिकेच्या मूळ लेखिका **कमला भसीन** यांनी *अंडरस्टँडिंग जेंडर* ही अतिशय सोप्या शब्दात लिहिलेली आणि खूप गाजलेली पुस्तिका आपल्यासाठी मराठीत प्रकाशित करत आहोत.



अभिव्यक्ती

सहयोग मूल्य रु.१०/-